**उपविभागीय अधिकारी, तथा भुसंपादन अधिकारी, अचलपूर यांचे कार्यालय**
**फोन नं.०७२२३-२२७२०० फॅक्स क्र.०७२२३-२२७३११ ई-मेल** sdo.achalpur@gmail.com

---

क्र/अका/भू.सं./कावी-१०९ /२०२०    दिनांक :- ३१/०१/२०२०

---

**खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत**

# -: जाहीर नोटीस :-

**वाचा :-** म.शा.महसुल व वनविभाग यांचे परिपत्रक क्र.एलक्युएन/०१/२०१७/प्र.क्र.१२/भाग/अ-२/ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २५/०१/२०१७

**भु.सं.प्र.क्र.०२/४७/२०१९-२०मौजा कांरजा बहीरम**
**ता.चांदूरबाजार जि.अमरावती**

ज्याअर्थी **जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, अमरावती** यांनी **पाझर तलाव बोदड (मौजा कांरजा बहीरम)** ने बाधीत होणाऱ्या **पाझर तलावाचे कामाकरीता** या सार्वजनिक प्रयोजनाकरीता शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण ०३/२०१५ /प्र.क्र.३४/अ-२/ दिनांक १२/०५/२०१५ व दिनांक ३०/०९/२०१५ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने **जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, अमरावती** यांचे नांवे घेण्याबाबत त्यांचे **पत्र क्र.३४१९/१९ दिनांक १९.११.२०१९ भुसंपादन प्रस्ताव क्र. ०२/४७/२०१९-२० मौजा कांरजा बहीरम एकूण क्षेत्रफळ १.१४ हे.आर** प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्या अर्थी, जिल्हाधिकारी, अमरावती यांचे **आदेश क्र.७५०/१९ दिनांक २७.११.२०१९** अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५ व दिनांक ३०/०९/२०१५ आणि तद्नुषंगीक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक, महसूल व वनविभाग क्र.एलक्युएन-०१/२०१७ प्र.क्र.१२/अ-२ दिनांक २५/०१/२०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी आता

१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी **संदीपकुमार श.अपार, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अचलपूर** याव्दारे -

**अनुसूची (एक)**

खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने **जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, अमरावती** यांचे नांवे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे. आणि

**अनुसूची (दोन)**

प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेतांना जिल्हास्तरीय समिती मार्फत भुसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल १ च्या तरतुदीनुसार संबंधीत जमीनीसाठी परिगणित होणाऱ्या एकुण मोबदल्याच्या रक्कमेवर २५ टक्के रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

**अनुसूची (तिन)**

संबधीत भुधारकाकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे **जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, अमरावती** यांचे नांवे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपुर्णत व अंतिमरित्या स्वीकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे.

२) संबंधीत भुधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) **जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, अमरावती** यांचेकडे दाखल करावीत.

३) संमती पत्राचा (विकल्प) विहीत नमुना **उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद उपविभाग (ल.पा) अचलपूर** यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत/ **उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद उपविभाग (ल.पा) अचलपूर** यांचेमार्फत भुधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

४) सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या पुनर्वसन आराखडयाची प्रत **उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद उपविभाग (ल.पा) अचलपूर** यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भुधारकांना किंवा हितसंबंधीत व्यक्तीना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसूची (एक)**

**भुसंपादन प्रकरण क्रमांक ०२/४७/२०१९-२० मौजा कांरजा बहीरम ता.चांदूरबाजार जि.अमरावती**

प्रकल्पाच्या आखणीमध्ये समाविष्ठ (खरेदी घ्यावयाच्या) जमीनीचा तपशिल

| अ.क्र. | भुधारकांचे नाव | राहणार | गट सर्व्हे क्रमांक | भुधारणा प्रकार | ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र (हे.आर) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सौ.शितल शशिकांत कुळकर्णी | कांरजा बहीरम | ३८८ | भो.वर्ग-१ | १.१४ | १.१४ |
| **एकूण** | | | | | **१.१४** | **१.१४** |

(संदीपकुमार श.अपार)
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी,
अचलपूर